# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

Maharashtra Industrial Development Corporation

**(A Government of Maharashtra Undertaking)**

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☎:०२२-४७४८४३१२/४७४८४६७९/९९

प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☎ : +९१-२२-४०१६१४५१/५४

www.midcindia.org


क्रमांक: मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/ P160713 दिनांक: 01/01/2025

## परिपत्रक

**विषय: भूखंड / शेड / गाळा वाटप, हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन, सबलीज व मुदतवाढ इत्यादी बाबत अधिकारांमध्ये सुधारणा करणे.**

संदर्भ: १) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/डी१४५०२ दिनांक २६.०९.२०१६.
२) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/ई०३२११, दिनांक ०६.१२.२०२२.
३) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/ई०९६२३, दिनांक २०.०६.२०२३.
४) शुध्दीपत्रक क्र मऔविम/भूविभाग/पी३४४३९, दिनांक २१.०६.२०२३.
५) शुध्दीपत्रक क्र मऔविम/भूविभाग/पी८८८६०, दिनांक २६.०९.२०२३.
६) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/पी५५६७४, दिनांक ०१.१२.२०२३.
७) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/पी१४३२६५, दिनांक १४.१०.२०२४.
८) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/पी१४५२२०, दिनांक २४.१०.२०२४.
९) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/पी१५३०२१, दिनांक ०३.१२.२०२४.

महामंडळाने विकसीत केलेल्या औद्योगिक क्षेत्रामधील आरेखीत भूखंडाचे वाटप MIDC Disposal of Land Regulations, १९७५ मधील तरतुदीप्रमाणे तसेच महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या बैठकीत वेळोवेळी ठरावाद्वारे घेतलेल्या निर्णयानुसार / प्रशासकीय निर्णयानुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे करण्यात येते. संदर्भिय परिपत्रक/ शुध्दीपत्रकानुसार भूखंड/ शेड/ गाळा यांचे वाटप, हस्तांतरण व इतर प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या प्रादेशिक अधिकारी/ उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावरील भूखंड वाटप समित्यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. तथापि, सदर



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

अधिकारांमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने महामंडळाचे **संदर्भांकित परिपत्रक क्रमांक १ मधील मुद्दा क्रमांक ५ मध्ये** भूखंड वाटप समितीच्या अधिकारासंदर्भांत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. तसेच, संदर्भ क्रमांक २ ते ९ परिपत्रके या परिपत्रकाद्वारे अधिक्रमित / रद्द करण्यात येत आहेत.

## <u>५. भूखंड वाटप समितीचे अधिकार</u>

भूखंड/शेड/गाळा वाटप, हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन, सबलीज व मुदतवाढ मंजुर करण्यासाठी पुढील प्रमाणे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | | | कामकाज विषय | अधिकार प्रदान केलेली समिती / अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | २ | ३ |
| ५.१ | भूखंड / शेड / गाळा वाटप, हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन, सबलीज व मुदतवाढ. | | | |
| | १) | औद्योगिक भूखंडाचे (एमएसएमई भूखंडासह) वाटप व हस्तांतरण (MMR, PMR & NMR (नागपूर) क्षेत्र वगळून) | | |
| | | अ) | ८,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | आ) | ८,००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. पर्यंत | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | इ) | २०,००१ चौ.मी. व त्यावरील | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | २) | MMR, PMR & NMR (नागपूर) क्षेत्रातील औद्योगिक भूखंडाचे (एमएसएमई भूखंडासह) वाटप व हस्तांतरण | | |
| | | अ) | ४,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | आ) | ४,००१ चौ.मी. ते ८,००० चौ.मी. पर्यंत | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | इ) | ८,००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. पर्यंत | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | ई) | २०,००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | ३) | **औद्योगिक भूखंडाचे (एमएसएमई भूखंडासह) एकत्रिकरण, विभाजन, सबलीज व मुदतवाढ.** | | |
| | | अ) | ८,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक अधिकारी |
| | | आ) | ८,००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. पर्यंत | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | | इ) | २०,००१ चौ.मी. व त्यावरील | सह मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | ४) | **माहिती तंत्रज्ञान व जैव तंत्रज्ञान उद्यानातील / औद्योगिक क्षेत्रातील सर्व प्रकारच्या भूखंडाचे हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन, सबलीज व मुदतवाढ.** | | |
| | | अ) | १००० चौ.मी. पर्यंत | प्रा.अ. (मा व तं) |
| | | आ) | १००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | प्रा.अ. (मा व तं) यांचेमार्फत सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेल्या कार्यभारानुसार. |
| | ५) | **व्यापारी भूखंड/व्यापारी गाळयांचे तसेच निवासी भूखंडांचे हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन, सबलीज व मुदतवाढ.** | | |
| | | अ) | १००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक अधिकारी. |
| | | आ) | १००१ चौ.मी. ते १०००० चौ.मी. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | | इ) | १०००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | सह मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | ६) | **बिल्टअप शेड / गाळ्यांचे हस्तांतरण व सबलीज करणे** | | |
| | | अ) | **माहिती तंत्रज्ञान / जैव तंत्रज्ञान उद्यानातील बिल्टअप शेड / गाळे (एमएमआर क्षेत्र वगळून) तसेच औद्योगिक क्षेत्रातील बिल्टअप शेड / गाळे** | प्रादेशिक अधिकारी |



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

midcconsultants.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आ) | एमएमआर क्षेत्रामधील माहिती तंत्रज्ञान / जैव तंत्रज्ञान उद्यानातील / औद्योगिक क्षेत्रातील (IT/BT) बिल्टअप शेड / गाळे | |
| | | | (क) १००० चौ.मी. पर्यंत | प्रा.अ. (मा व तं) |
| | | | (ख) १००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | प्रा.अ. (मा व तं) यांचेमार्फत सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेल्या कार्यभारानुसार. |
| | ७) | सोयी-सुविधा तसेच दिनांक ०९.०२.२०१०, १५.०३.२०२४ व १३.०८.२०२४ च्या परिपत्रकानुसार सवलतीच्या दराने भूखंडाचे वाटप करणे. | | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | ८) | प्रकल्पग्रस्त / अपंग सदराखाली जमिनीचे वाटप करणे | | |
| | | अ) | प्रकल्पग्रस्त / अपंग सदराखाली १०० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडाचे वाटप करणे तसेच प्रकल्पग्रस्तांना १५ टक्के परतावा जमिनीचे वाटप करणे. (एमएमआर व पीएमआर मधील औद्योगिक क्षेत्र वगळून) | प्रादेशिक अधिकारी |
| | | आ) | एमएमआर व पीएमआर मधील औद्योगिक क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त / अपंग सदराखाली १०० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडाचे वाटप करणे तसेच प्रकल्पग्रस्तांना १५ टक्के परतावा जमिनीचे वाटप करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | | इ) | प्रकल्पग्रस्तांच्या गटाने स्थापन केलेल्या JVC/ Partnership Firm ला भूखंडाचे वाटप करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | ९) | प्राधान्य सदराखाली सर्व प्रकारच्या भूखंडाचे वाटप करणे. | | मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती |
| | १०) | ई-निविदाद्वारे भूखंड / शेड / गाळे वाटप करणे (औद्योगिक, निवासी (महामंडळाच्या कर्मचा-यांच्या मागणी व्यतिरीक्त), व्यापारी, माहिती व तंत्रज्ञान / जैव तंत्रज्ञान उद्यानातील बिल्ट-अप गाळे, Plug & Play गाळे-इत्यादि) | | |
| | | अ) | ऑनलाईन सरळ पध्दतीने भूखंडाचे वाटप | प्रादेशिक अधिकारी यांनी संबंधीत उप मु.का.अ. यांचेमार्फत मु. का. अ. यांच्या मान्यतेने ऑनलाईन अर्ज |



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | मागवावेत. प्राप्त अर्जांची तांत्रिकदृष्ट्या छाननी झाल्यानंतर अपात्र अर्जाबाबतच्या प्रस्तावास सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेण्यात यावी. तसेच तांत्रिक छाननीअंती पात्र अर्जदारांचा वित्तीय लिफाफा उघडण्यात येऊन पात्र अर्जदारांपैकी उच्चतम दर नमूद करणारा अर्जदार (H१) निश्चित झाल्यानंतर प्राप्त दराच्या विवरण पत्रासह प्रस्ताव उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मंजुरीसाठी सादर करण्यात यावा व मंजुरीनुसार वाटपाबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. |
| | | आ) | **ई-निविदा पध्दतीने भूखंडाचे वाटप** | मु. का. अ. यांच्या मान्यतेने उप मु.का.अ. यांचेमार्फत ई-निविदा काढण्यात याव्यात. प्राप्त ई-निविदांची तांत्रिकदृष्ट्या छाननी झाल्यानंतर अपात्र निविदांबाबतच्या प्रस्तावास सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेण्यात यावी. तसेच तांत्रिक छाननीअंती पात्र निविदाधारकांचा वित्तीय लिफाफा उघडण्यात येऊन पात्र निविदाधारकांपैकी उच्चतम दर नमूद करणारा निविदाधारक (H१) निश्चित झाल्यानंतर प्राप्त दराच्या विवरण पत्रासह प्रस्ताव सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मंजुरीसाठी सादर करण्यात यावा व त्यावरील मंजुरीनुसार वाटपाबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. |

midcconsultants.in



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | |
|---|---|---|---|
| ११) | वृक्षारोपण / बागबगीचा / सुशोभिकरण या प्रयोजनासाठी जागा उपलब्ध करुन देणे. | | |
| | अ) | ८,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत (एमएमआर व पीएमआर मधील औद्योगिक क्षेत्र वगळून) | प्रादेशिक अधिकारी |
| | आ) | ८,००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत (एमएमआर व पीएमआर मधील औद्योगिक क्षेत्र वगळून) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | इ) | एमएमआर व पीएमआर मधील औद्योगिक क्षेत्रातील २०,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत तसेच इतर औद्योगिक क्षेत्रातील २०,००१ चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाचे भूखंड | सह मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | ई) | एमएमआर व पीएमआर मधील औद्योगिक क्षेत्रातील २०,००१ चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाचे भूखंड | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| १२) | उत्पादनातील बदलासह भूखंड / शेड / गाळा हस्तांतरणाचा प्रस्ताव मंजूर करणे. माहिती तंत्रज्ञान/जैव तंत्रज्ञान उद्यानातील घटक वगळून उद्योग घटकाच्या उत्पादनात बदल होऊन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या लाल (Red) प्रवर्गातील उत्पादनात होत असल्यास अथवा लाल (Red) प्रवर्गाअंतर्गत बदल होत असल्यास, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पर्यावरण) यांचे अभिप्राय घेऊन सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पुर्व मान्यतेने. | | |
| | (क) MMR, PMR & NMR (नागपूर) क्षेत्र वगळून इतर क्षेत्रातील उत्पादनातील बदलासह भूखंड / शेड / गाळा हस्तांतरणाचा प्रस्ताव मंजूर करणे. | | |
| | अ) | ८,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | आ) | ८,००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. पर्यंत | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | इ) | २०,००१ चौ.मी. व त्यावरील | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | (ख) MMR, PMR & NMR (नागपूर) क्षेत्रातील उत्पादनातील बदलासह भूखंड / शेड / गाळा हस्तांतरणाचा प्रस्ताव मंजूर करणे. | | |
| | | अ) | ४,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | आ) | ४,००१ चौ.मी. ते ८,००० चौ.मी. पर्यंत | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | इ) | ८,००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. पर्यंत | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | ई) | २०,००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| ५.२ | प्राप्त होणारे इतर प्रस्ताव. | | | |
| | १) | कंपनी अधिनियमाखाली स्थापन झालेल्या कंपनीच्या नावातील बदलाची नोंद घेणे. (आवश्यकतेनुसार स्थानिक पॅनल वकील यांचे अभिप्राय घेऊन) | | |
| | | अ) | ८,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक अधिकारी |
| | | आ) | ८,००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. पर्यंत | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | | इ) | २०,००१ चौ.मी. व त्यावरील | सह मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | २) | भागिदारी संस्था, स्वत:ची संस्था इत्यादिच्या नावातील बदलाची नोंद घेणे. (आवश्यकतेनुसार स्थानिक पॅनल वकील यांचे अभिप्राय घेऊन) | | |
| | | अ) | ८,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक अधिकारी |
| | | आ) | ८,००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. पर्यंत | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | | इ) | २०,००१ चौ.मी. व त्यावरील | सह मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | ३) | सक्षम न्यायालये, डीआरटी, बँका/वित्तीय संस्था इत्यादिमार्फत झालेल्या सर्व प्रकारचे भुखंड, शेड, गाळयांच्या हस्तांतरणाबाबत. (अशा प्रकरणी प्रादेशिक अधिकाऱ्यांनी महामंडळाच्या सर्व येणे रक्कमा वसूल करणेबाबत स्थानिक पॅनल वकीलांचे सहकार्याने त्वरीत संबंधित प्राधिकरणाकडे संपर्क साधून त्याप्रमाणे कार्यवाही करावी) | | |
| | | अ) | ८,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक अधिकारी |
| | | आ) | ८,००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. पर्यंत | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | | इ) | २०,००१ चौ.मी. व त्यावरील | सह मुख्य कार्यकारी अधिकारी |

midcconsultants.in



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रातील वर नमूद अधिकारांप्रमाणे प्रादेशिक अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर अंतिम निर्णय झालेल्या भूखंड / शेड / गाळा वाटप, हस्तांतरण, एकत्रिकरण व मुदतवाढ तसेच इतर प्रस्तावांबाबतचा अहवाल दर महिन्याच्या शेवटच्या दिवशी प्रादेशिक अधिकारी यांनी संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावा.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रादेशिक अधिकारी यांच्या स्तरावर अंतिम झालेल्या एकूण प्रस्तावांपैकी किमान १० टक्के प्रस्तावांची पुनर्तपासणी करावी. त्याचप्रमाणे सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर अंतिम झालेल्या एकूण प्रस्तावांपैकी किमान ५ टक्के प्रस्तावांची पुनर्तपासणी करावी. सदर अंतिम निर्णय प्रक्रियेत कोणतीही अनियमितता आढळून आल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी.

वरीलप्रमाणे मुद्दा क्रमांक ५ मधील बदलाव्यतिरिक्त संदर्भिय परिपत्रक क्रमांक १ मध्ये कोणताही बदल / सुधारणा करण्यात आली नाही. सर्व संबंधितांनी उपरोक्त सुधारीत धोरण, कामकाजाची विभागणी व अधिकारातील बदल इत्यादीची नोंद घ्यावी व तात्काळ प्रभावाने कार्यवाही करण्यात यावी.

(पी. वेलरासू, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई

प्रत:
(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुख्यालय, मुंबई
(२) मुख्य अभियंता (पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर)
(३) महाव्यवस्थापक (भूमी/ विधी/भूसंपादन/मा व तं /जनसंपर्क/ मबवि/डीएमआयसी/पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजीनगर/ नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ, मुंबई / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in